# सहकाऱ्यांवर अण्णांची नाराजी

## केजरीवाल, बेदी, सिसोदिया आणि भूषण यांना अण्णा कंटाळले?

## अण्णा तडकाफडकी ब्लॉग बंद करणार

**नवी दिल्ली/प्रतिनिधी**

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे आपल्या सध्याच्या टीमबाबत समाधानी नसल्याचे आणि त्यांनी काही दिवसांपूर्वी या टीममध्ये बदल आणि विस्तार करण्याची तयारी सुरू केली होती, असे आता त्यांनीच लिहिलेल्या एका पत्रावरून समोर आले आहे. अरविंद केजरीवाल, किरण बेदी, मनीष सिसोदिया आणि प्रशांत भूषण यांच्यावरील नाराजीमुळेच त्यांनी हा निर्णय घेतला होता, असा स्पष्ट उल्लेख या पत्रात असल्याचे राजू परुळेकर यांनी ब्लॉगवर म्हटले आहे. यामुळे प्रचंड खळबळ माजली होती. परंतु आता कोअर कमिटी भंग करण्याचा विचार आपल्या मनात आला होता. निर्णय घेतला नव्हता, असे स्पष्ट करीत अण्णांनी ब्लॉग बंद करणार असल्याचे जाहीर केले आहे.

आपल्या लाखो चाहत्यांपर्यंत आपले विचार पोहोचविण्यासाठी अण्णांनीदेखील 'ब्लॉग' या आधुनिक मार्गाचा वापर सुरू केला होता. परंतु यामुळे ते वारंवार अडचणीत आले. आता तर या ब्लॉगवरून त्यांची आपल्या टीमवरील नाराजीच समोर आली आहे. २३ ऑक्टोबर २०११ रोजी अण्णांनी याबाबत प्रसिद्धीस दिलेली चिठ्ठी त्यांचे ब्लॉगर राजू परुळेकर यांनी ब्लॉगवर टाकली आहे. टीमचे सदस्य अरविंद केजरीवाल, ▶▶ पान ६ वर....